**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे वार्षिक लेखे व ताळेबंध यांचे लेखा परिक्षण करणे आणि विद्यापीठाच्या निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेतन पडताळणी करणे.**

**महाराष्ट्र शासन,**
**कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक मपवि १००४ / प्र.क्र. ७९ / पदुम १**
**मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ३ जून, २००५**

संदर्भ :- १) कुलसचिव, मपमविवि, नागपूर यांचे पत्र, दिनांक २० मे, २००४
२)कुलसचिव, मपमविवि, नागपूर यांचे पत्र, दिनांक २२ जुले, २००४
३) मुख्य लेखा परिक्षक यांचे पत्र दिनांक २४ जून २००४

**प्रस्तावना :-**

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठास विलीन करण्यात आलेल्या सर्व संस्था या अगोदर कृषि विद्यापीठांतर्गत समाविष्ट होत्या. त्यामुळे या संस्थांचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा विभागाकडून पूर्वीप्रमाणेच करता येणे शक्य आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.९.१९७५ नुसार कृषि विद्यापीठांचे लेखे मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० अन्वये लेखा परिक्षण करण्यासाठी मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा यांची पूर्वलक्षी प्रभावाने सन १९७२-७३ पासून संविधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ४ नुसार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातील संस्थांचे लेखा परिक्षण करण्यासाठी मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा यांची लेखा परिक्षक म्हणून नियुक्तीबाबतचा विषय शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

१. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर अंतर्गत असलेली महाविद्यालये, प्रक्षेत्रे व उदगीर उप केंद्राचे लेखा परिक्षण करण्यासाठी मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० च्या कलम ४ नुसार मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा यांची लेखा परिक्षक म्हणून या आदेशाद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे.

२. विद्यापीठांतर्गत असलेली उक्त घटक महाविद्यालये आणि प्रक्षेत्रे यांच्या लेखा परिक्षण कक्षेबाबत कार्यक्षेत्र ठरवून देण्यात आलेले आहे. वर्ग झालेल्या संस्था ज्या उपमुख्य लेखा परिक्षक (वरीष्ठ) यांच्या कार्यकक्षेत येतात त्यांच्याकडूनच संबंधीत संस्थांचे लेखा परिक्षण करण्यात यावे. तथापि महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असल्याने संपूर्ण विद्यापीठाचे लेखा परिक्षण उपमुख्य लेखापरिक्षक (वरीष्ठ), नागपूर यांच्या नियंत्रणाखालीच असेल. लेखापरिक्षण अहवालाचे अंतिमीकरण उपमुख्य लेखापरिक्षण (वरीष्ठ) नागपूर यांच्याकडून करण्यात यावे.

३. सदर विद्यापीठाचे लेखापरिक्षण मुंबई वित्तीय नियमावली १९५९ नियम १९३ नुसार सशुल्क असून लेखापरिक्षण शुल्क विद्यापीठाने शासन लेख्यात जमा करण्यात यावे.

४. तसेच या विद्यापीठाचे स्वतंत्र लेखासंहिता तयार होईपर्यन्त सध्या कृषि विद्यापीठाच्या लेखा संहिते प्रमाणे लेखे ठेवण्याची शासन मान्यता देत आहे व लेखा संहितेतील नियम ३.५९ अन्वये विद्यापीठाच्या नियंत्रकाची विहित केलेल्या नमुन्यात मागील वित्तीय वर्षाचे लेखे १५ जुलै पर्यन्त तयार करुन स्थानिक निधी लेखा विभागास लेखा परिक्षणासाठी सादर करणे बंधनकारक राहील.

५. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची वेतन पडताळणी स्थानिक निधी लेखा परिक्षण, लेखा यांच्याकडून करुन घेण्यास शासन मान्यता देत आहे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( जे. पी. डांगे )**
**प्रधान सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. राज्यपाल यांचे उप सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पसं) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पसं) यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग
उप सचिव (वित्त विभाग)
प्रधान सचिव (पदुम) यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ, नागपूर
नियंत्रक, (लेखा व वित्त) महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ, नागपूर
वित्त विभाग (लोलेस) मंत्रालय, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे मुंबई
मुख्य लेखा परिक्षण, स्थानिक निधी लेखा यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), नागपूर
निवडनस्ती